


गव्हाची बाहुली


एलिसन रान्डेल

मराठी: अश्विनी बर्वे

मैरी-एन, यूटाहच्या ओबडधोबड भागात राहत होती. ती आपले रोजची कामे करत असे. ती भाजीच्या बागेची काळजी घेत असे आणि चिंध्याचे गालिचे तयार करत असे. तिची सगळ्यात चांगली मैत्रीण म्हणजे त्यांची घरी तयार केलेली आवडती बाहुली होती. तीसच्या बाहुलीचे शरीर गव्हाणे भरलेला होते. तिचे डोळे कधी बंद होत नसत. पण मैरी-एन नेहमी बेट्टीवर भरोसा करत असे. बेट्टी, मैरी एनचे बोलणे ऐकत असे आणि तिचे गुपित सुरक्षित ठेवत असे.

एक दिवस खूप जोराचे वादळ झाले. मैरी-एनच्या कुटुंबाला आपल्या घरात आसरा घ्यावा लागला. मैरी-एनला आपल्या बाहुलीला बागेतून काढण्यास वेळच मिळाला नाही. जेव्हा हवा आणि पाऊस कमी झाला, तेव्हा मैरी-ऐन, बेट्टीला शोधण्यास बाहेर पडली. पण तिची बाहुली बेट्टी कुठे सापडली नाही. वर्ष निघून गेले. पण मैरी-एनने आपली बाहुली शोधण्याचे सोडले नाही. शेवटी जेव्हा हिवाळा वसंतात बदलला, तेव्हा मैन एनने एक आश्चर्यजनक शोध लावला.

गव्हाची बाहुली



एलिसन रान्डेल
चित्र: बिल फ़ार्नस्वोकथ



उन्हाळा होता. मैरी-एनने आपल्या कपाळावरचा घाम पुसला आणि मग एका गाजराची शेंडी पकडून ते ओढले. पण गाजराने जमिनीतून हल्ण्यास नकार दिला.

“याला तर खूप वेळ लागेल बेट्टी," मैरी-एनने धाप टाकत म्हटले.

बेट्टीने उत्तर दिले नाही. बेट्टी कधीच उत्तर देत नसे. बेट्टीने आतापर्यंत फक्त एकच आवाज केला होता. गव्हाने भरलेल्या तिच्या शरीरातून गव्हाचे दाणे हलण्याचा आवाज येत असे. पण मैरी-एनला माहीत होते की तिची बाहुली बेट्टी तिचे म्हणणे ऐकत आहे.

"माफ़ कर बेट्टी, मला गाजरासाठी अजून जागा हवी आहे," मैरी-एन म्हणाली. मग तिने आपल्या ॲप्रनच्या खिशातून बाहुली खेचली आणि तिला बागेतल्या एका झाडाच्या बुंध्यावर ठेवले. तिथे बेट्टी सरळ आणि स्थिर बसली. तिची पापण्या असलेले डोळे कधी झाकले जात नाही. पण मैरी-एनला माहीत होते की बेट्टी लक्ष देत आहे.

मग बेट्टीने बघितले की मैरी-एन, गाजराच्या वाफ्यातून निघाली आणि तिने एक-एक करून सर्व गाजरे ओढून बाहेर काढली.

शेवटी, जेव्हा मैन-एनचे खिसे भरले तेव्हा तिने आपल्या ॲप्रनमध्ये ती करकचून बांधली आणि गाजरे ठेवण्यासाठी ती तळघराकडे निघाली.

तिने पहाडांवर गोळा होणाऱ्या काळ्या ढगांकडे आणि जोराने वाहणाऱ्या हवेकडे लक्ष दिले नाही.








जसे मैरी-एनने तळघरातल्या थंड अंधारात गाजरे ठेवली,तिच्या आईने तिला बोलावले.

"मैरी-एन, लवकर ये! आणि या फटी बुजवण्यास मदत कर." मग त्यांनी आपल्या मुलीकडे चिंध्यांचा बंडल सोपवला.

"पण आई,", मैरी एनला आपल्या बाहुलीची आठवण झाली.

"नाही, बाळा आता तू बाहेर जाऊ शकत नाही," तिची आई ठामपणे म्हणाली. "बाहेर खूप वेगाने वादळ वाहत आहे."

लवकर, मैरी-एनने जुने कपड्यांचे छोट छोटे तुकडे केले. तिने ते आपल्या घरातील फटी बुजवण्यासाठी वापरण्याचा प्रयत्न केला. ज्या फटीतून थोडासा प्रकाश आत येत होता त्या तिने भरल्या. फटीमध्ये चिंध्या भरल्याने वाऱ्याने वाहिलेली धूळ आणि हवा आत येणार नाही.



हवेचा एक मोठा वेगवान झोत दरी पार करून गेला. तो बागेतून गेला आणि त्याने मक्याची रोपे पडली. त्यामुळे बिचारी बेट्टी सरळ झाडाच्या बुंध्यावर पडली आणि तिचे डोके दगडावर आपटले.मग ती खाली एका खडकाच्या फटीत पडली.

मैरी-एनने घरातल्या फटी बुजवण्याचे काम संपवले. पण ती बागेकडे धावत जाण्यापूर्वी,बाबांनी हवेच्या अजून एका झोताबरोबर दरवाजा उघडला. आता बाहेर दिवसाचे आकाश रात्रीसारखे झाले होते.

“हे वादळ एकदम भयंकर आहे,“ ते म्हणाले.

“हत तेरे की!" मैरी-एन रडू लागली. “माझी बेट्टी बागेत बाहेर आहे!”

“पण आता तू तिचा शोध घेण्यास जाऊ शकत नाही,” वडील म्हणाले.

"मला ते करावेच लागेल,” मैरी-एनने जोर देऊन म्हटले, पण आईच्या बारीक, मजबूत हातांनी तिला थोपटले..

“तू असे करणार नाहीस,” ती म्हणाली.

बाहेर, जोराच्या पावसामुळे बेट्टीचे शरीर भिजले. तिच्या आत भरलेले गहू फुगू लागला. अचानक, पहाडावरून मातीचा एक तुकडा तुटला आणि त्यामुळे मैरी-एनची बाहुली झाकली गेली. आता बेट्टी मातीच्या खाली फसली, आणि नजरेसमोरून गेली.





असे वाटत होते की वादळ कायमस्वरूपी होत राहील. पण जसे वादळ थांबले, मैरी-एन दरवाज्यातून निघाली. बाग तर अशी वाटत होती की जसे काही एका मोठ्या झाडूने बागेची सफाई केली आहे.

मैरी-एन त्या झाडाच्या बुंध्याकडे पळाली जिथे तिने बेट्टीला सोडले होते. पण तिची सगळ्यात चांगली दोस्त कुठे गेली होती.

मैरी-एनने सगळीकडे शोधले - बुंध्याच्या मागे, मक्याच्या रोपांखाली, आणि पहाडाच्या खाली..

"बेट्टी!" ती घाबरून परत परत ओरडली, “तू कुठे आहेस?”








मैरी-एन वर खाली असणाऱ्या वाफ्यातून चालली. ती आपल्या बाहुलीला बोलवत होती आणि हाका मारत होती. तिच्या डोळ्यातील आसवामुळे तिला अंधुक दिसत होते. तिला काही समजण्याच्या आधीच रात्र होऊ लागली होती.

तिला बेट्टी कुठेच सापडली नाही.

तेव्हाच मैरी-एनकडे एक कंदील घेऊन कोणीतरी आले. ते बाबा होते. ते अंधारात आले आणि आपल्या मुलीला आपल्या रुंद खांद्यावर उचलून घेऊन गेले..

“हे बघ आत्ता आत थांबण्याची वेळ आहे,” ते म्हणाले.








दिवस आणि महिने गेले, पण मैरी-एनने बेट्टीचा शोध घेणे कधी थांबवले नाही. आपल्या सर्वात चांगल्या मैत्रिणीशिवाय तिला हिवाळा खूप लांबला आहे असे वाटत होते. तिला आपल्या बाहुलीच्या शरीरातून गव्हाचा येणारा आवाज आठवत होती. आणि तिला आपल्या ॲप्रनचा खिसा रिकामा वाटत होता. तसे तर मैरी-एनला करण्यासाठी भरपूर काम होते. जेव्हा ती मेणबत्त्या बनवत असे किंवा गालीचा विणत असेल तेव्हा बेट्टी सारखे तिच्याजवळ बसून बघणारे कोणी नव्हते.

जेव्हा मैरी एन भरतकाम करत असे तेव्हा तिला बेट्टीची रेशीम कपड्याचे डोळे, तोंड आणि बाहुलीचे कान आठवत असत.

जेव्हा ती शाळेतून घरी येई, तेव्हा रस्त्यात दुसऱ्या मुलींच्या गप्पा ऐकून तिला आपली मैत्रीण बाहुलीची आठवण येई. जिच्यावर ती आपली गुपिते जपून ठेवण्यासाठी विश्वास करू शकत असे.





शेवटी, लांबलेला हिवाळ्यानंतर वसंत आला. मैरी-एनने एक टोपली उचलली आणि ती बागेकडे निघाली. हा पेरण्याचा मोसम होता, गाजराच्या बिया त्याच्या वाफ्यात पेरण्याचा काळ होता. तिला वाटत होते की बेट्टी तिथे असावी आणि तिने रोपांना जमिनीतून निघतांना बघावे.

मैरी-एनने बेट्टीच्या बाबत विचार न करण्याचा खूप प्रयत्न केला. ती त्याच बुंध्याजवळ उभी राहिली आणि तिने ताज्या वसंताच्या हवेचा एक दीर्घ श्वास घेतला.

तेव्हा तिने बघितले की पहाडाच्या तळात असणाऱ्या चिखलात काहीतरी हिरवे आणि टोकदार गोष्ट उगवत आहे. तिने बुंध्यावरून उडी मारली आणि ते बघण्यासाठी ती उतारावरून धावू लागली.

चिखलाच्या एका छोट्याशा तुकड्यात काहीतरी अंकुरित होत होते. त्या तुकड्याला एक वेगळाच आकार आला होता. त्या तुकड्याला दोन हात, दोन पाय आणि एक डोके होते. ते काय असू शकेल?

मैरी-एनने कोवळ्या घासातून आपली बोटे फिरवली. "बेट्टी?" ती कुजबुजली. “अच्छा, हे तू आहेस?”

कोवळ्या पातळ पानांच्या स्पर्शातून तिला काहीतरी जाणवत होते. आता मैरी-एनला माहीत होते की बेट्टी तिचे बोलणे ऐकत असणार.







पूर्ण उन्हाळाभर मैरी-एनने गव्हाच्या त्या तुकड्याची सेवा केली. शेवटी हिरव्या रंगाचे ते अंकुर मोठे झाले आणि सोन्यासारख्या रंगात बदलले. तिने गव्हाचे कणिस कापले. मग ती शिलाईच्या कामाला लागली.तिने बेट्टी च्या नवीन डोळ्यांकडे आणि कानांकडे विशेष लक्ष दिले.



मैरी-एन जवळ बेट्टीला सांगण्यासाठी खूप काही होते, आणि तिला माहीत होते की तिची मैत्रीण तिचे बोलणे ऐकत आहे.



मैरी-एनच्याबाबत

१८०० च्या दशकाच्या शेवटी,यूटाहच्या क्षेत्रात, मैरी-एन विंटर्स नावाची एका मुलीने आपली गव्हाची बाहुली हरवली. फ्रंटियरच्या मुलांकडे फॅन्सी खेळणी नसत.मुलींना आपल्या बाहुलीसाठी जे सामान उपलब्ध आहे,त्यातूनच ती तयार करावी लागे. बेट्टी बाहुली, कपड्यांच्या तुकड्यापासून बनवली गेली होती आणि अशा बाहुल्यांमध्ये नेहमी लाकडाचा भुसा,कापूस आदि गोष्टी भरल्या जात. मैरी-एनने आपल्या बाहुलीत गहू भरला, कारण तिचे कुटुंब शेतात तेच उगवत असत.

मला हे माहीत नाही की मैरी-एन विंटरच्या बाहुलीचे खरे नाव काय होते आणि ती कशी हरवली. मला हे ही माहीत नाही की मैरी-एनने नंतर एक नवीन बाहुली तयार केली की नाही. पण मला हे माहीत आहे की ती पुढच्या वसंतापर्यंत आपल्या बाहुलीला विसरली नाही आणि जेव्हा तिने आपल्या बाहुलीला नवीन गव्हाच्या रुपात वाढतांना बघितले तेव्हा तिला खूप आनंद झाला. मला हे कसे कळले? कारण मैरी-एनने आपल्या मुलांना त्याबाबत सांगितले. मग तिच्या मुलांनी त्यांच्या मुलांना. आणि शेवटी मैरी-एनच्या वंशजाने ती कहाणी मला सांगितली.